मुस्लिम नेत्यांचा वोट जिहादचा ऐलान: महायुतीविरोधात ठाकरे गटाचे षडयंत्र? >> पान 2

शिवसेनेच्या जनसंवाद यात्रेत श्रीकांत शिंदे यांनी घेतला भिवंडी ग्रामीण, भिवंडी पूर्व विधानसभेचा आढावा >> पान 3

सिंदखेडराजामध्ये काका-पुतणी लढत होणार..? >> पान 4

**सुविचार**

नेहमी तत्पर रहा, बेसावध आयुष्य जगू नका.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




'...अन् मग मी अखेरचा श्वास घेईन'; शाहरुख खानने का केली सेटवर मरण्याची गोष्ट? आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 74 ■ रविवार, दि. 20 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## मनोज जरांगे पाटील महाविकास आघाडीला पाठिंबा देतील लक्ष्मण हाके यांचा दावा



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** मनोज जरांगे पाटील यांनी गरजवंत मराठा समाजासाठी सुरू केलेले आरक्षण आंदोलन आता एका राजकीय टप्प्यावर आले आहे. लोकसभा निवडणूकीत त्यांनी महाविकास आघाडीला मदत केली होती. विधानसभा निवडणुकीमध्ये जरांगे पाटील निवडणूक न लढवता ते महाविकास आघाडीला पाठिंबा देतील असा टोला ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी लगावला आहे. मनोज जरांगे पाटील यांना आरक्षणातील काही कळत नाही. त्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे मराठा समाजाचे नुकसान झाले आहे.

## वनविभागात चोर सोडून संन्याशाला फाशी !

**नागपूर/प्रतिनिधी :** अवैध लाकूड वाहतूक प्रकरणाला अडीच महिने होऊनही कारवाईवरुन वनखात्यातील वरिष्ठ अधिकारी संभ्रमात आहेत. तब्बल अडीच महिन्यानंतर आता ज्या विभागाअंतर्गत ही घटना घडली, त्या विभागाच्या अधिकाऱ्याला जबाबदार न धरता कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करत हे प्रकरण बंद करण्यात आल्याची चर्चा खात्यात आहे. वनखात्यात वरिष्ठ जबाबदार असला तरीही कनिष्ठांवर कारवाई करुन प्रकरण संपवायचे हा पायंडा पडत चालला आहे. वाघाची शिकार, मानव-वन्यजीव संघर्ष, अवैध लाकूड किंवा इतर प्रकरणांमध्ये कायम कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई ठरलेली आहे. यापूर्वीदेखील अनेक प्रकरणात याच पद्धतीचा निवाडा वनखात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केला आहे. लाकूड वाहतूकीसाठी त्या विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेला वाहतूक परवाना आणि वाहनक्रमांक पाहूनच कनिष्ठ कर्मचारी साहित्य तपासून वाहनांना जाऊ देतात.वाहतूक परवाना देताना आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी त्या विभागाच्या अधिकाऱ्याची आहे. एवढेच नाही तर वाहतूक परवाना विभागावर नियंत्रण ठेवणे हेदेखील त्या अधिकाऱ्याचे काम आहे. त्यामुळे अशास्थितीत अवैध मालवाहतूक झाल्यास तो अधिकारी देखील तेवढाच दोषी ठरतो. मात्र, या प्रकरणात सुरुवातीपासूनच 'त्या' अधिकाऱ्याला वाचवण्याचे प्रयत्न होत आहेत. नागपुरातून लाकडाची वाहतूक करण्यासाठी सेमिनरी हिल्स वनपरिक्षेत्राअंतर्गत आवश्यक तपासणीनंतर वाहतूक परवाना दिला जातो. जुलै महिन्यात कापसी येथील एका लाकूड व्यापाऱ्याला कापलेल्या लाकूड वाहतूकीचा परवाना देण्यात आला. मात्र, यातून गोल लाकडाची वाहतूक होत असल्याचे समोर आले.




# जागा वाटपाबाबत प्रमुख पक्षांच्या वाटाघाटी सुरु

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून सोमवार दि.२२ ऑक्टोबरपासून अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस प्रारंभ होणार आहे. त्यामुळे महायुती व महाविकास आघाडीसह इतर पक्षाच्या वतीने कोणती जागा कोणाला द्यायची याबाबत विचारविनीमय करून वाटाघाटी सुरू केली आहे. अद्याप कोणत्याही पक्षाने जागा व उमेदवार निश्र्चित केला नसला तरी, कोणती जागा कोणाला सोडण्यात येणार याबाबत विचारविनिमय करण्यासाठी बैठकांवर बैठकांचा सिलसिला सुरू आहे. तर ज्या जागांबाबत घटक पक्षाचा कोणताही वाद नाही अशा जागा निश्र्चित झाल्या असून जाहीर करण्याची औपचारिकता राहिली आहे. तर अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया जवळ येत आहे. त्या जागा जाहीर करण्याच्या हालचाली वाढल्या आहेत.



### जागावाटपाची पहिला यादी रविवारी जाहीर शकते : पृथ्वीराज चव्हाण



महाविकास आघाडीची जागा वाटपाबाबत बैठकीचे दोन भाग होते. सकाळी १२ वाजता बैठक झाली, त्यात मित्रपक्षाच्या जागावाटपाची चर्चा झाली. त्यांची जागावाटपाची कुठपर्यंत चर्चा आली आहे, याची माहिती आम्ही घेतली. त्यानंतरची दुपारी ३ वाजता बैठक ११ राष्ट्रीय निरक्षिक पाठवलेले आहेत.महाराष्ट्रामध्ये, प्रत्येक विभागामध्ये २-२ निरक्षिक केलेले आहे. त्या सर्वांची बैठक रमेश चेन्नीथला यांच्या सोबत झाली हा रणनीतीचा भाग आहे. जागावाटपाची पहिला यादी रविवारी जाहीर शकते. अशी माहिती माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

### आमची पहिली यादी कधीही येऊ शकते : देवेंद्र फडणवीस



जागावाटपा संदर्भातील चर्चा अंतिम टप्प्यात आहे. शुक्रवारी सकारात्मक चर्चा होऊन ज्या अडचणीच्या जागा होत्या,त्यातील काही जागा क्लिअर केल्या आहेत. उरलेल्या जागा आम्ही क्लिअर करु, क्लिअर झालेल्या जागांची त्या-त्या पक्षाने घोषणा करावी, आमची पहिली यादी कधीही येऊ शकते. अशी माहिती भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

### लाडकी बहीण योजनेचा निधी सरकारनं थांबवला, नवे अर्जही स्वीकारणं बंद

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांसाठी मोठी बातमी आहे. आतापर्यत या योजनेअंतर्गत २ कोटी ४० लाखांहून अधिक पात्र महिलांना पाच महिन्यांचे हप्ते प्राप्त झाले आहेत. परंतु, निवडणुकीच्या काळात पुढचे हप्ते महिलांना मिळू शकणार नाहीत. कारण, तात्पुरत्या स्वरुपात लाडकी बहीण योजनेला स्थगिती मिळाली आहे.केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार, राज्यात २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यामुळे राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेच्या काळात मतदारांवर थेट प्रभाव टाकणाऱ्या आर्थिक योजना बंद कराव्यात अशा सूचना निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिल्या आहेत. त्यानुसार, महिला आणि बालकल्याण विभागाकडून या योजनेसाठी लागणारा निधी थांबवला आहे. परिणामी निवडणुका होईपर्यत लाडकी बहीण योजनेचे पैसे पात्र महिलांना मिळणार नाहीत. दरम्यान, राज्य सरकारने या योजनेअंतर्गत ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे एकत्र पैसे दिले होते. त्यामुळे आता डिसेंबर महिन्याच्या हप्त्याची प्रतिक्षा करावी लागणार आहे.

## दरे गावातील महिलांनी मुख्यमंत्र्यांचा ताफा अडवला, 'पुन्हा राज्यात आपले सरकार यायला हवे' सांगत दिले आशीर्वाद



दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** राजकारणाच्या धकाधकीतून थोडा वेळ काढून अराम करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोन दिवस त्यांच्या सातारा जिल्ह्यातील दरे या मूळ गावी गेले होते. तिथे एक दिवस आराम करून परत मुंबईकडे निघताना अचानक त्यांचा ताफा त्यांच्याच गावातील काही महिलांनी थांबवला. गाडी थांबताच, या महिलांनी पुढे येऊन मुख्यमंत्र्यांना आपल्याला ओळखले का ? असे विचारले. यातील काही माता भगिनींचे आपल्या आईशी अत्यंत जिव्हाळ्याचे सबंध असल्याने मुख्यमंत्र्यांनी त्यांना चटकन ओळखले. तसे त्या महिलांनी पुढे येऊन मुख्यमंत्र्यांची आस्थेने विचारपूस केली. या महिलांनी हातात औक्षणाचे ताट घेऊन त्यांना ओवाळले. त्यानंतर या महिलांनी मुख्यमंत्र्यांना आशीर्वाद दिले. तसेच राज्यात पुन्हा एकदा आपले सरकार यायला हवे, पुन्हा निवडून या आणि आम्हाला भेटायला या असेही सांगितले.

## उद्धव ठाकरे मुंबईत भाकरी फिरवणार, दोन आमदारांना डच्चू?

### अजय चौधरी आणि फातर्पेकरांचा पत्ता कट?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ चे बिगुल वाजले आहे. सर्वच राजकीय पक्षांकडून विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयारी केली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्री निवासस्थानी गुरुवारी ठाकरे गटाच्या आमदारांची बैठक बोलावली होती. मात्र या बैठकीला विधानसभेतील पक्षाचे गटनेते अजय चौधरी आणि चेंबूरचे आमदार प्रकाश फातर्पेकर यांना बोलावण्यात आले नाही. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत या दोघांचा पत्ता कट होणार का? अशा चर्चांना आता उधाण आले आहे. आता यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यातील विधानसभा निवडणुकांची घोषणा केली असून २० नोव्हेंबर रोजी राज्यात एकाच टप्प्यात मतदान होत आहे. तर, २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार असून उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी २९ ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाची बैठक पार पडली. एकूण १५ विद्यमान आमदार या बैठकीला उपस्थित होते.

चेंबूरमधून अनिल पाटणकर इच्छुक

या बैठकीला चौधरी आणि फातर्पेकर यांना निमंत्रण देण्यात आले नाही. त्यामुळे हे दोन आमदार अस्वस्थ असल्याची माहिती मिळत आहे. या दोन मतदारसंघांत



विद्यमान आमदारांव्यतिरिक्त प्रबळ दावेदार असल्यामुळे या मतदारसंघाचा तिढा आता खुद्द उद्धव ठाकरे सोडवणार असल्याची माहिती मिळत आहे. चेंबूरमध्ये विद्यमान आमदार प्रकाश फातर्पेकर असले तरी माजी नगरसेवक अनिल पाटणकर हे उमेदवारीसाठी इच्छुक आहेत.

शिवडीतून सुधीर साळवी प्रबळ दावेदार

तर शिवडी मतदारसंघातील विद्यमान आमदार अजय चौधरी हे आतापर्यंत दोनदा निवडून आले आहेत. उद्धव ठाकरे यांनी चौधरी यांना विधानसभेच्या गटनेतेपदी नेमले होते. मात्र गटनेते पदावरून चौधरी यांची आक्रमकता दिसली नाही. त्यातच लोकसभा निवडणुकीत शिवडीमध्ये मताधिक्य घटल्यामुळे चौधरी यांच्याविरोधात मतदारसंघात नाराजी आहे का? याबाबतही चाचपणी केली जात आहे. तर सुधीर साळवी हे यंदा शिवडीतून उमेदवारीसाठी प्रबळ दावेदार आहेत. त्यामुळे आता या दोन आमदारांचा पत्ता कट होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

काय म्हणाले संजय राऊत?

दरम्यान, शिवसेनेच्या मुंबईतल्या विद्यमान आमदारांना डच्चू मिळेल अशी चर्चा आहे. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, मला असं वाटत नाही. उद्धव ठाकरे हे कालपासून कामाला लागलेले आहेत. अजय चौधरी आणि प्रकाश फातर्पेकर यांना बैठकीच्या आमंत्रण नव्हते. याबाबत विचारले असता ते म्हणाले की, एकाच दिवशी सगळ्यांना आमंत्रण दिले जात नाही. अजय चौधरी हे पक्षाचे ज्येष्ठ आमदार आहेत. ते शिवसेनेचे विधानसभेचे गटनेते आहेत. त्यांच्या विषयाच्या अशा अफवा कोणी पसरत असेल तर ते चुकीचे आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

## महायुतीचं ठरल्यातच जमा! शिंदेंची शिवसेना मुंबईत १५ जागा लढण्याची शक्यता

### अजितदादांच्या आणि भाजपच्या वाट्याला काय?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत शिवसेना शिंदे गट १५ जागांवर निवडणूक लढणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मुंबईतील एकूण १७ जागांवर काही महिन्यांपूर्वी शिवसेनेनं निरीक्षक नेमले होते. आता या १७ पैकी १५ जागा शिवसेनेच्या वाट्याला आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. तसेच, उर्वरित जागा भाजप आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मिळणार असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, मुंबईतील महायुतीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला देखील फायनल झाल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, मुंबईत शिंदे गट १५ जागांवर निवडणूक लढणार असल्याची माहिती, तर भाजप १७ किंवा १८ जागा आणि राष्ट्रवादी ३ किंवा ४ जागांवर लढण्याची शक्यता आहे.

मुंबईतील महायुतीचा संभाव्य फॉर्म्युला :

शिवसेना : १५ जागा

भाजप : १७ किंवा १८ जागा

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट : ३ किंवा ४ जागा

शिवसेनेच्या निरीक्षक नेमलेल्या 'त्या' १७ जागा

भायखळा, वरळी, शिवडी, जोगेश्वरी पूर्व, दिंडोशी, चेंबूर, अणुशक्ती नगर, धारावी, भांडुप पश्चिम, माहीम, विक्रोळी, मागठाणे, चांदिवली, कलिना, कुर्ला, अंधेरी पूर्व, मालाड पश्चिम, या १७ जागांवर शिवसेनेनं निरीक्षक नेमले होते. आता विधानसभा निवडणुकीपूर्वी या निरिक्षकांची निवड करण्यात आली होती.

विधानसभेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी फार पूर्वीच कंबर कसली होती. याच पार्श्वभूमीवर त्यांनी मोठी घोषणा केली आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या धर्तीवर त्यांनी शिवसेनेच्या पहिल्या टप्प्यात ११३ विधानसभा मतदारसंघातील ४६ विधानसभा प्रभारी जाहीर केल्या होत्या. तसेच, ९३ विधानसभा निरीक्षकपदाच्या नियुक्त्या जाहीर केल्या होत्या.

महायुतीतल्या जागावाटपाचा तिढा सुटला?

महायुतीतमधल्या जागावाटपाचा तिढा जवळपास सुटल्याची शक्यता आहे. महायुतीच्या जागांबाबत दिल्लीमध्ये अमित शाहांच्या समक्ष चर्चा झाली. मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस आणि अजित पवार यांची अमित शाहांसोबत अडीच तास चर्चा झाली. जागावाटपाचा तिढा आता तीनही नेत्यांनी सोडवला असल्याची माहिती आहे. आता फक्त काही जागांचाच प्रश्न बाकी आहे अशी माहिती दिल्लीतून समजतेय.



# मुस्लिम नेत्यांचा वोट जिहादचा ऐलान: महायुतीविरोधात ठाकरे गटाचे षडयंत्र?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्रातील विशिष्ट समुदायाच्या मतांचे एकत्रीकरण करण्यासाठी राज्यात धार्मिक तेढ वाढवून राजकीय फायदा मिळविण्याचे षडयंत्र सुरू असून यास कोणत्या नेत्यांची फूस आहे याची चौकशी करावी अशी मागणी प्रदेश भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत केली. भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुतीस मतदान करणारा मुस्लिम नव्हेच, अशा शब्दांत महायुतीच्या विरोधात धार्मिक विखार पेरणाऱ्या एका धर्मगुरुचा व्हिडियो समाजमाध्यमांवरून सर्वत्र फैलावला असताना, वोट जिहाद या विखाराचा आणखी कोणता नवा पुरावा निवडणूक आयोगास हवा, असा सवालही उपाध्ये यांनी केला.

वोट जिहाद हा काल्पनिक प्रकार नसून विशिष्ट धार्मिक समुदायास महायुतीच्या विरोधात मतदान करण्याकरिता धार्मिक बाबींना पुढे करून धमकावण्याचे प्रकार सुरू असल्याचे लोकसभा निवडणुकीतच समोर आले होते. अशा वोट जिहादी संकल्पनेमुळे महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघांपैकी किमान १४ मतदारसंघांत वोट जिहादचा प्रभाव दिसून आल्याने, या समुदायाच्या मतदारांनी हिंदुत्ववादी विचाराच्या उमेदवारांच्या विरोधात जाणीवपूर्वक मतदान केले, हा वोट जिहादचाच प्रकार होता. अशा प्रकारास फूस लावण्यासाठी महायुतीच्या विरोधातील काही राजकीय नेत्यांनी विशिष्ट समुदायांच्या नेत्यांशी हातमिळवणी केली असून त्या समुदायाच्या धार्मिक हितरक्षणाची आश्वासने देऊन त्यांना युतीविरोधी मतदानास भाग पाडले, असा आरोपही त्यांनी केला. अगदी अलीकडे, मुस्लिम समुदायाच्या एका नेत्याने मुस्लिमांना महायुतीच्या विरोधात मतदान करण्याचे जाहीर आदेश दिल्याची ध्वनिचित्रफीतच समोर आल्याने वोट जिहादचे राजकीय षडयंत्र स्पष्ट झाले असून, मुस्लिमांनी महायुतीस मतदान करू नये असे स्पष्ट आदेश या नेत्याने दिल्याचे या चित्रफितीमध्ये दिसते, असे सांगून उपाध्ये यांनी ती ध्वनिफीतच प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना ऐकविली.

लोकसभा निवडणुकांच्या आसपास मुस्लिम मतांचे एकगठ्ठा एकत्रिकरण करण्यासाठी शिवसेना उबाठा गटाचे तसेच शरद पवार गटाचे नेते सक्रिय झाल्याची शंका व्यक्त होत होती, उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे यांनी तर मुस्लिम समुदायाच्या नेंत्यांचा पाहुणचार करून, देशातील सीएए कायदा अंमलात येणार नाही यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही दिल्याचा आरोपही उपाध्ये यांनी केला. संपूर्ण देश ज्या कायद्यासाठी आग्रही आहे, तो कायदा लागू करू नये या मुस्लिम समुदायातील काही नेत्यांच्या मागणीस पाठिंबा देणारे ठाकरे आता वोट जिहादला प्रोत्साहन देत आहेत का, असा सवालही श्री. उपाध्ये यांनी केला. याच समुदायाच्या नेत्यांनी उबाठा गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवशी त्यांना शाल पांघरली आणि तलवार भेट दिली होती, याकडेही उपाध्ये यांनी लक्ष वेधले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्ववादी विचारांस हरताळ फासून मुस्लिम लांगूलचालन करणाऱ्या उद्धव व आदित्य ठाकरे यांच्या प्रेरणेमुळे वोट जिहादचा प्रकार महाराष्ट्रात फोफावेल अशी भीती उपाध्ये यांनी व्यक्त केली. त्यांची फूस असल्यामुळेच मुस्लिमांना महायुतीच्या विरोधात मतदान करण्याचे जाहीर आवाहन करण्याचे प्रकार धार्मिक नेत्यांकडून सुरू असल्याचा आरोपही उपाध्ये यांनी केला.

## विक्षिप्त हुकुमशहांमुळे जग अडचणीत !

जगात अनेक विक्षिप्त हुकुमशहा होऊन गेले आहेत. या विक्षिप्त हुकुमशहांमुळे अनेकदा जग अडचणीत आले आहे. या विक्षिप्त हुकुमशहांमुळे अनेक युद्ध झाली आहेत. उत्तर कोरियाचा हुकुमशहा किम जोंग उन हा ही असाच एक विक्षिप्त हुकुमशहा आहे. तो कधी काय निर्णय घेईल याचा नेम नाही. आताही या विक्षप्त हुकुमशहाने असाच एक निर्णय घेऊन संपूर्ण जगाची डोकेदुखी वाढवली आहे. किम जोंग उन याने आता उत्तर कोरियाच्या घटनेतच बदल केला आहे. किम जोंग उन याने आपल्या घटनेत बदल करताना दक्षिण कोरियाला आपला नंबर एकचा शत्रू म्हणून घोषित केले आहे. त्याने तसे आपल्या घटनेतच तसे नमूद केले आहे. शत्रूचा उल्लेख असणारी एकमेव घटना अशी आता उत्तर कोरियाची ओळख बनली आहे. किम जोंग उन याने जानेवारी महिन्यातच दक्षिण कोरियाला आपला नंबर एकचा शत्रू घोषित केले होते. इतकेच नाही तर उत्तर कोरियातून दक्षिण कोरियाकडे जाणारे रस्ते आणि रेल्वेचे दुवे ही तोडून टाकले आहेत. त्याने घटनेतच बदल करून दक्षिण कोरियाला आपला शत्रू म्हणून घोषित करून घटनेत असेही नमूद केले आहे की जर दक्षिण कोरियाने आमच्या जमीन, हवा, पाण्याच्या ०.००१ मिमी क्षेत्रावरही अतिक्रमण केले तर आम्ही दक्षिण कोरियाशी युद्ध पुकारु. प्रसंगी युद्धात अण्वस्त्रांचाही वापर करू. किम जोंग उन ने घटनेत बदल करून दक्षिण कोरियाला शत्रू नंबर १ घोषित तर केलेच आहे त्यासोबतच आपल्या सैन्यात नवीन १४ लाख सैनिकांची भरती करण्याचे आदेशही दिले आहेत. उत्तर कोरियाकडे आता १२ लाख सैनिक असून सहा लाख सैनिक राखीव आहेत त्यात या चौदा लाख सैनिकांची भर पडणार आहे. उत्तर कोरिया आज अण्वस्त्र संपन्न राष्ट्र आहे. या देशाकडे अनेक अण्वस्त्रे आहेत. तसेच तो सातत्याने क्षेपणास्त्रांची चाचणी घेत असतो. क्षेपणास्त्रांची चाचणी घेऊन तो अमेरिकेलाही इशारा देत असतो. अर्थात त्याला रशिया आणि चीनचा पूर्ण पाठींबा आहे त्याच जोरावर तो हे सर्व करत आहे पण हे करताना तो जगाला ही विनाशाच्या खाईत नेत आहेत. किम जोंग उन ने अशा प्रकारे घटनेत बदल करून दक्षिण कोरियाला नंबर १ चा शत्रू घोषित केल्याने दक्षिण कोरियाच्या अडचणी वाढल्या असून दक्षिण कोरिया ही किम जोंग उन ला जशास तसे उत्तर द्यायला तयार आहे. किम जोंग उन च्या या उदव्यापामुळे कोरियन द्वीपकल्पात कमालीचा तणाव वाढला आहे. उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यातील वैर जगाला नवे नाही. या दोन देशात गेली अनेक दशकांपासून वैर आहे. हे वैर थांबायचे नाव घेत नाही उलट वाढतच चालले आहे. आता किम जोंग उन ने घटनेत केलेल्या या बदलामुळे या दोन देशातील वैर आणखी वाढणार आहे. कदाचित ते युद्धापर्यंत ही पोहचू शकते. आधीच रशिया – युक्रेन आणि इस्राईल – पॅलेस्टाईन युद्धाने जग ग्रासले आहे त्यात आता या नव्या युद्धाची भर पडली तर जगाची चिंता आणखी वाढेल.

## पुरेसे पाणी प्या; अन्यथा होतील 'ह्या' समस्या

एखादी गोष्ट सुंदर आणि डोळ्यांना सुखावणारी असेल तर ते काम होईल. ज्यांना सहसा जिममध्ये जाणे आवडत नाही त्यांच्यासाठीही, गोंडस ट्रॅकसूट खरेदी केल्याने त्यांना ते घालावेसे वाटेल. तसेच, व्यवस्थित मांडलेल्या डेस्कमुळे कामाचा उत्साह वाढतो. हेच तत्व पाण्याला लागू होते. त्यामुळे तुम्हाला आवडणारी सुंदर रंगीत किंवा आकाराची बाटली विकत घ्या. ते पाण्याने भरून तुमच्या समोर ठेवा. त्यामुळे पाणी पिण्याची इच्छा वाढते. बाटली पाहिली की पाणी पिण्याची आठवण येते.

या क्रमाने, तज्ञांनी सुचवले आहे की दररोज ठराविक वेळी पाणी पिणे अनिवार्य : सकाळी उठल्यावर दोन ग्लास पाणी प्यावे असा तज्ज्ञांचा सल्ला आहे. त्यामुळे सर्व अवयव व्यवस्थित काम करतात. टिफिन किंवा जेवणाच्या अर्धा तास आधी एक ग्लास पाणी प्या. यामुळे पचनसंस्था चांगली काम करते. आंघोळ करण्यापूर्वी एक ग्लास पाणी प्या. यामुळे उच्च रक्तदाब टाळता येतो. रात्री झोपण्याच्या अर्धा तास आधी एक ग्लास पाणी प्यायल्याने हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता कमी होते.

पाण्याला अशी चव आणा : 'पाण्याला चव नसते आणि ते प्यावेसे वाटत नाही', असे अनेकांना वाटणे स्वाभाविक आहे. या प्रकरणात आपण पाण्यात काही चव घालण्याचा प्रयत्न करू शकता जेणेकरून ते अधिक चवदार आणि पिण्यास सोपे होईल. मात्र यासाठी बाजारात उपलब्ध कृत्रिम फ्लेवर्स घालण्याची गरज नाही. घरी उपलब्ध असलेल्या फळांसह पाण्याची चव घेता येते. पुदिन्यासारखी पाने किंवा फळेही पाण्यात मिसळून त्याचा स्वाद घेता येतो. यासाठी पुदिना, टरबुजाचे तुकडे, स्ट्रॅाबेरी, किरा यांपैकी कोणतेही तुकडे पाण्यात टाकून फ्रीजमध्ये ठेवले तर उत्तम. फळांमधील पोषक तत्वांसोबत त्यांची चवही पाण्यात शोषली जाते.

भूक लागते तेव्हा थोडे पाणी प्या : कधीकधी आपले शरीर तहानेलाच भूक समजते. म्हणूनच जेव्हा जेव्हा आपल्याला तहान लागते तेव्हा आपल्याला भूक लागते आणि आपण जास्त खातो. यामुळे अनावश्यक कॅलरीज शरीरात जातात आणि आपल्याला लठ्ठ बनवतात. त्यामुळे जेव्हा तुम्हाला भूक लागते तेव्हा थोडे पाणी पिण्याचा प्रयत्न करा. मग दहा मिनिटे थांबा. भूक कमी झाली तर ठीक आहे. अन्यथा कोणतेही आरोग्यदायी अन्न खा. असे केल्याने वजन वाढणे टाळता येते. दररोज पुरेसे पाणी पिणे हा एक चांगला सराव आहे. एक छोटेसे काम पूर्ण करा आणि थोडे पाणी प्या. त्याचप्रमाणे लोकांना पाणी पिण्याची आठवण करून देण्यासाठी विविध प्रकारचे ॲप्स वापरता येतात.

पाणी पिण्याचे फायदे : सकाळी उठल्यावर पाणी प्यायल्यास शरीरातील सर्व अवयव उत्तेजित होतात. तुम्ही व्यायामानंतर पाणी प्यायल्यास व्यायामादरम्यान वाढलेली हृदयाची गती सामान्य होईल. जेवणाच्या अर्धा तास आधी पाणी प्यायल्याने खाल्लेले अन्न पचण्यास मदत होते. अंघोळीपूर्वी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रित ठेवता येतो. जर तुम्ही झोपण्यापूर्वी पाणी प्यायले तर तुम्ही दिवसभरात शरीरातील गमावलेले द्रव परत मिळवू शकता. जेव्हा तुम्हाला सुस्त वाटत असेल तेव्हा पाणी प्यायल्याने तुम्हाला त्वरित ऊर्जा मिळते. संसर्गामुळे घसादुखीचा त्रास होत असल्यास कोमट पाणी प्या वेदना कमी करून संसर्गापासून मुक्तता मिळवू शकता.

## रात्रीच्या जेवणात हे तीन पदार्थ कधीच खावू नका; नाहीतर पोटाच्या समस्या उद्भवतील

रात्रीचे जेवण फक्त जेवण नसून उद्याच्या दिवसभरासाठी उर्जा देते. यामुळं शरीरात उर्जा टिकून राहते. त्याचबरोबर पोषणदेखील मिळते. मात्र, रात्री तुम्ही जेवणात काय खाता व कस आहार घेता यावर हे सर्व अलवंबून असते. त्यामुळं रात्रीच्या जेवणात जर तुम्ही काही चुकी करत असाल तर आत्ताच सावध व्हा. कारण या चुकांचा तुमच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

इन्स्टाग्रामवरील एका रीलमध्ये आयुर्वेदिक आणि आरोग्य तज्ज्ञ डॉक्टर डिंपल यांनी रात्रीच्या जेवणात साधारणत: होणाऱ्या चुकांबाबत सांगितले आहे. तसंच, या तीन चुका टाळा नाहीतर आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. ज्यामुळं तुम्ही तुमचं डिनरचा आनंदही घेऊ शकता आणि तुमचं आरोग्यही बिघडणार नाही.

पहिली चुक: जेवणाच्या वेळी फळे खाणे

फळे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. यातील अँटीऑक्सिडेंट्स हे आपले शरीर हेल्दी ठेवण्यास मदत करतात. मात्र, जेवणात जर तुम्ही फक्त फळे खात असाल तर ही तुमची खूप मोठी चुक आहे. तज्ज्ञांच्या मते, फळांमध्ये ॲक्टिव्ह एंजाइम असतात. ज्यामुळं ते शरीरात कॉफीप्रमाणे काम करतात. तसंच, त्याचा परिणाम झोपेवर होतो. तसंच, शरीरातील ग्लुकोजची लेव्हलदेखील वाढवते. त्यामुळं फळ नेहमी संध्याकाळी किंवा सकाळी खाणे चांगले आहे.

दुसरी चुक: स्टार्ची,फ्राइड फुड्स खाणे

जर तुम्ही डिनरमध्ये स्चार्च व कार्ब्स असलेले पदार्थ खाता जसे की, पिझ्झा, पास्ता, फ्रेंच फ्राइज किंवा बटाटे. या पदार्थांमुळे ब्लड शुगर लेव्हल वाढवण्याबरोबरच फूड क्रेव्हिंग वाढवण्याचे काम करते. त्याचबरोबर फ्राइड फुडच्या मुळं जेवण व्यवस्थित पचतदेखील नाही.

तिसरी चुक: सलाडमध्ये कॉम्प्लेक्स क्रूसिफेरस भाज्या

रात्रीच्या जेवणात जर तुम्ही सलाड खात असाल तर कॉम्प्लेक्स क्रूसिफेरस भाज्या म्हणजेच ब्रोकली, कोबी, फ्लोवर सारख्या भाज्यांचा समावेश करु नका. कारण या भाज्यांचे पचन होण्यास खूप वेळ लागतो. यामुळं गॅस आणि ब्लोटिंगची समस्या होऊ शकते.

रात्रीच्या जेवणात काय खावे?

रात्रीच्या जेवणात व्हेजिटेबल सूपसारखे पर्याय घ्या. कारणे हे पौष्टिक तर असते पण शरीराला आवश्यक असलेले पोषणदेखील पुरवते. यासाठी तुम्ही जेवणात गाजर, बीटरुट, पालक यासारखे सूप घेऊ शकता. जर तुमच्या शरीरात लोहाची कमतरता कमी असेल तर हे सूप प्या. तसंच, तुमच्या शरीरात फॅटची कमतरता असेल तर भोपळ्याचे सूप प्या. वजन कमी करायचे असेल तर मिलेट खिचडी किंवा डाळ-भात किंवा भाजी-भात खाऊ शकता. कारण हे हेल्दी तर असते पण त्याचबरोबर तुमच्या क्रेव्हिंग शांत करण्यासही मदत करते.

## मूत्राशयाचे आरोग्य हेल्दी ठेवायचंय? 'या' पदार्थांचा डाएटमध्ये करा समावेश

जर तुम्हाला मूत्रमार्गात संसर्ग होतो किंवा मूत्राशय अतिसंवेदनशील किंवा अतिक्रियाशील असेल तर काही विशिष्ट पदार्थ तुमची लक्षणे आणखी वाढवू शकतात. हे ओळखणे महत्त्वाचे आहे की, असे पदार्थ देखील आहेत ज्यांचा सकारात्मक परिणाम होऊ शकतो. मूत्राशयाचे आरोग्य चांगले राखणेयासाठी तुमच्या आहारात खालील पदार्थांचा समावेश करा. जाणून घ्या डॉ जितेंद्र साखराणी, युरोलॉजिस्ट, अपोलो स्पेक्ट्रा मुंबई यांच्याकडून.

नाशपाती हे उच्च फायबरयुक्त आणि मॅलिक ॲसिडयुक्त असल्याने मूत्राशयाच्या आरोग्याला चालना मिळते. हे मूत्रमार्गातील खडे टाळण्यासाठी मदत करू शकते. त्यामधील व्हिटॅमिन सी मूत्राशयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

स्ट्रॅाबेरी, रास्पबेरी, ब्लूबेरी आणि क्रॅनबेरी यांसारख्या बेरीजमध्ये फ्लेव्होनॉल्स आणि व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असतात जे बॅक्टेरियाशी लढतात. त्यांच्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते जे मूत्राशयावाटे विषारी द्रव्य बाहेर काढण्यास मदत करतात.

आपल्या आहारात ब्राऊन राईस, क्विनोआ आणि बार्ली यांसारख्या धान्यांचा समावेश केल्याने मूत्राशय निरोगी राखण्यास मदत होते.

ओट्स हा फायबरचा एक मौल्यवान स्त्रोत आहे, जो बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करतो आणि मूत्राशयावरील दाब कमी करून मूत्राशयाचे आरोग्य राखण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. ते मूत्राशयासंबंधीत वेदना कमी करण्यास मदत करतात.

उच्च प्रथिने, फायबर आणि आवश्यक पोषक घटकांमुळे मूत्राशयासाठी सुकामेवा हा आणखी उत्तम स्रोत ठरतो. बदाम, काजू, शेंगदाणे आणि सूर्यफूलाच्या बिया हे मूत्राशयाच्या आरोग्यासाठी चांगले पर्याय आहेत.

लसणाचा आहारात समावेश केल्याने मूत्रमार्गाच्या संसर्गाचा सामना करता येतो. यासाठी जेवणात लसुण वापरण्याचा सल्ला दिला जातो

बीन्स शरीराला हायड्रेटेड ठेवण्यास मदत करतात, मूत्राशयाच्या कार्याला चालना देतात आणि मूत्रमार्गाच्या संसर्गाची (यूटीआय) शक्यता कमी करतात.

तुम्ही खात असलेल्या अन्नाचा तुमच्या मूत्राशयाच्या आरोग्यावर परिणाम होत असतो. काही खाद्यपदार्थांमुळे तुमच्या मूत्राशयाला त्रास होऊ शकतो आणि तर काही पदार्थ मूत्राशयाचे आरोग्य चांगले राखण्यास मदत करतात. मसालेदार पदार्थ ही मूत्राशयाच्या अस्तरांवर ताण निर्माण करतात. ज्यामुळे अस्वस्थता आणि वारंवार लघवी होऊ शकते. लिंबूवर्गीय फळांमध्ये अम्लाचे प्रमाण अधिक असते आणि ते मूत्राशयासंबंधीत वेदना वाढवू शकतात.

एस्पार्टम सारख्या कृत्रिम स्वीटनर्सचा मूत्राशयाच्या जळजळीशी संबंध आहे. कॉफी, चहा, चॉकलेट आणि सोड्यामध्ये आढळणारे कॅफिन हे लघवीचे प्रमाण वाढवणारा पदार्थ म्हणून कार्य करतात आणि मूत्राशयाच्या स्नायूंना उत्तेजित करू शकते, ज्यामुळे लघवीची वारंवारता वाढते. अल्कोहोलचा देखील मूत्राशयावर असाच प्रभाव असल्याचे ज्ञात आहे, म्हणून हे या पदार्थांचे सेवन मर्यादित करणे किंवा टाळणे योग्य राहिल. तसेच कार्बोनेटेड पेये, टोमॅटो, व्हिनेगर किंवा लोणचे या पदार्थांचे सेवन मर्यादीत प्रमाणात करणे गरजेचे आहे.निरोगी जीवनशैलीचा अवलंब करून आणि भरपूर फळे, भाज्या आणि तृणधान्य असलेला आहार घेतल्यास तुमच्या मूत्राशयाचे आरोग्य सुधारण्यासाठी मदत होईल.

## महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचा मेळावा

**नांदेड/प्रतिनिधी :** विद्युत महावितरण विज तांत्रिक कामगारांचा नांदेड येथील शालिमार फंक्शन हॉलमध्ये केंद्रिय सभा व तांत्रिक कामगारांचा मेळावा २९ ऑक्टोबर रोजी भव्य दिव्य सभेसह मेळावा संपन्न झाला कामगारांच्या विविध प्रश्नावर विविध मान्यवरांनी आपले मत या मेळाव्यात व्यक्त केले.

या कार्यक्रमात प्रमुखचे मुख्य अतिथी व उद्घाटक सतीश चव्हाण, (संचालक संचलन, महापरेषण कंपनी, प्रकशगंगा, मुंबई) प्रमुख श्री अनिल डोये मुख्य अभियंता नांदेड, नासीर खदरी मुख्य अभियंता औरंगाबाद, सुंदर लटपटे मुख्य अभियंता लातूर, पवनकुमार कछोट मुख्य अभियंता औरंगाबाद आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या परिषद मेळाव्यामध्ये दि.११ ते २० डिसेंबर २०२४ दरम्यान व संघटनेचा २७ वा वर्धापन दिन आहे, आणि याच दिवशी महाअधिवेशन कोकणात सिंधुदुर्गात घेण्याबाबत चर्चा झाली व सर्वानुमते ठराव पारित करण्यात आला.

व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नावर अनेक मान्यवरांनी आपले प्रस्ताव मांडले विचार विनिमय झाले अनेक प्रस्ताव पण सर्वांमध्ये पारित करण्यात आले

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाऊसाहेब भाकरे पाटील हे होते कार्यक्रमाचे संयोजक सय्यद जहिरोद्दिन सरचिटणीस म. रा.वी.ता. कां. संघटना, शेख मुजीब रा. संघटन सचिव म. रा.वी.ता. कां. संघटना, यावेळी मेळाव्यामध्ये मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती या सह अधिकारी महिला कर्मचाऱ्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

मेळाव्याची सभा संपल्यानंतर सुरुची भोजनाचा स्वाद उपस्थितांनी घेतला

या मेळाव्यात नांदेड सह राज्यातील पदाधिकारी उपस्थित होत पदाधिकाऱ्यांचा विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले बॅग इतर साहित्य पण भेटवस्तू देण्यात आली.

## महिनाभर खाऊ नका तळलेले अन्न, दिसून येतील हे बदल


वजन कमी करणारे बहुतेक लोक प्रथम तळलेले अन्न किंवा गोड पदार्थ टाळण्याचा निर्णय घेतात. तथापि, हे करणे खूप कठीण आहे कारण आहारात नेहमी तळलेले काहीतरी समाविष्ट केले जाते. भारतातील लोकांना तळलेले किंवा मसालेदार पदार्थ खाण्याची सवय आहे. पण आजकाल गॅस, ॲसिडिटी किंवा फॅटी लिव्हर सारख्या समस्या सामान्य झाल्या आहेत. तुम्ही कधी विचार केला आहे का की असे पदार्थ महिनाभर खाल्ले नाहीत तर काय बदल होतात. महिनाभर तळलेले अन्न न खाल्ल्याने शरीरात कोणते बदल होतात ते आम्ही तुम्हाला सांगतो.

तुम्हाला माहिती आहे का की तळलेले पदार्थ कमी खाल्ले किंवा बंद केले तर पोटाचे आरोग्य सुधारण्यास सुरुवात होते. यामुळे अनेक समस्या दूर राहतात आणि निरोगी राहण्यास मदत होते. तळलेले थांबवण्याचा एक फायदा म्हणजे एखादी व्यक्ती चांगली झोपू शकते. यासोबतच मूडही फ्रेश राहतो.

संशोधनात असेही म्हटले आहे की जे लोक तळलेले अन्न खातात त्यांना फक्त पचनच बिघडते असे नाही तर गॅस आणि ॲसिडिटीचाही सामना करावा लागतो. अशा गोष्टी न खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते आणि ॲसिडिटीही दूर राहते. एकदा तळलेल्या गोष्टींपासून अंतर ठेवण्याचा प्रयत्न करा.

तळलेल्या अन्नाकडे दुर्लक्ष करून रोगप्रतिकारशक्ती वाढवता येते, असे तज्ञ डॉक्टर सांगतात. यासोबतच शरीरातील सूजही कमी होऊ लागते. जर एखाद्याला फॅटी लिव्हरची समस्या असेल तर त्याने चुकूनही तळलेले पदार्थ खाऊ नयेत.

अन्न तळण्यासाठी वापरण्यात येणारे तेल केवळ पोटालाच नाही तर त्वचेलाही हानी पोहोचवते. त्वचेवर अतिरिक्त तेल तयार होते आणि ते निस्तेज दिसू लागते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, काही दिवस तेलाचे सेवन बंद केल्यानंतर त्वचेवर ग्लोही दिसू शकतो.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### तब्बल २८० लॅपटॉप चोरणाऱ्या चोरट्यांना पुणे पोलिसांकडून अटक




दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** पुण्यातील वाघोली परिसरामधील एका लॅपटॉपच्या गोडाऊन मधून जवळपास २८० लॅपटॉपची चोरी त्याच गोडाऊन मध्ये काम करणाऱ्या सुरेश कुमारने त्याच्या साथीदारांसह केली होती

चोरलेले लॅपटॉप सुरेंद्रकुमार व त्याच्या साथीदारांनी पिकअप टेम्पोच्या माध्यमातून उत्तर प्रदेश मधील प्रयागराज कडे घेऊन निघाले होते यादरम्यान प्रवासामध्ये त्यांना पैसे मिळावे यासाठी काही लॅपटॉपची विक्री देखील त्यांनी केल्याचं आता उघड झाल असून पुणे पोलिसांनी आता एकूण नऊ आरोपींना ताब्यात घेत एक कोटी एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### विधानसभा निवडणुकीच्या काळात अफवा पसरु नये किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये, स्थानिक गुन्हे शाखेचे नागरिकांना आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात विधानसभेचे वेळापत्रक जाहीर झाले असून जालना पोलिस प्रशासनातर्फे निवडणुकीसाठी जय्यत तयारी सुरू आहे. त्या अनुषंगाने जालना जिल्ह्यामध्ये निवडणुका भयमुक्त वातावरणात व्हाव्यात यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून सायबर शाखेच्या वतीने तसेच शहरांमध्ये जागोजागी सीसीटीव्ही च्या माध्यमातून पोलिसांची करडी नजर असणार आहे. रात्री बे रात्री वाहनांचे कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येणार आहे. कोणीही अफवा पसरू नये किंवा अफवांवर विश्र्वास ठेवू नये, जातीय तेढ निर्माण होईल अशा प्रकारच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल करू नये असे आवाहन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी केले आहे.

### चोपडा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा अधिकारी आयुष प्रसाद यांनी घेतला आढावा



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळी सर्वत्र सुरू असल्याने प्रशासन देखील जोमाने कामाला लागले आहेत चोपडा विधानसभा मतदारसंघात कर्मचारी अधिकारी यांची बैठक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी घेतली त्याचबरोबर प्रशासकीय इमारतीत निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर विविध विभाग निर्माण करण्यात आले आहे त्या विभागात प्रत्यक्ष जाऊन विभाग निहाय माहिती घेतली व काही सूचना दिल्यात यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद चोपडा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी गजेंद्र पाटोळे , सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी भाऊसाहेब थोरात , पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप पोलीस निरीक्षक विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### विजय चौगुले यांची माघार नाहीच,फॉर्म भरणारच



**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख विजय चौगुले यांना राज्य सरकारने महामंडळ देऊ केले.त्यामुळे ऐरोली मतदार संघातून ते माघार घेतील असे वाटले असताना चौगुले आणखी आक्रमक झाल्याचे चित्र आहे.आपण कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नसून मी फॉर्म घेणार आणि उमेदवारी भरणार,मला महामंडळाची आवश्यकता नाही. मागे पण असेच महामंडळाची दिले होते,यावेळीही तेच केले. मात्र मी माघार घेणार नाही. मी एरोली मतदार संघात उमेदवारीवर ठाम आहे.दोन्ही पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी बोललो आहे.बघू ते काय बोलतात.पण माझी ९० टक्के तयारी झाली आहे.

# शिवसेनेच्या जनसंवाद यात्रेत श्रीकांत शिंदे यांनी घेतला भिवंडी ग्रामीण, भिवंडी पूर्व विधानसभेचा आढावा

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली असून महायुती आणि महाविकास आघाडीतील जागा वाटपाचे निश्र्चित होत असतानाच शिवसेना शिंदे गटाकडून भिवंडी ग्रामीण व भिवंडी पूर्व या विधानसभा मतदारसंघातील तयारीचा आढावा घेण्यासाठी शिवसेना लोकसभेतील घटनेते खासदार श्रीकांत शिंदे यांच्या



बैठकीचे आयोजन भिवंडीत करण्यात आले होते. यावेळी भिवंडी पूर्व,भिवंडी ग्रामीण या विधानसभा मतदार संघातील शेकडो पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या बैठकीत पक्षाच्या कामासोबतच महाराष्ट्र शासनाच्या लोक कल्याणकारी योजनांचा मतदारांपर्यंत कोणता प्रचार आणि प्रसार केला याची झाडाझडती सुद्धा खासदार श्रीकांत शिंदे यांनी या बैठकीत घेतली.या जनसंवाद यात्रा बैठकीमध्ये भिवंडी पूर्व व भिवंडी ग्रामीण या विधानसभा मतदारसंघात कशा पद्धतीने निवडणूक पूर्व पदाधिकाऱ्यांची तयारी सुरू आहे याचा आढावा घेतला. पक्ष बांधणी कशा पद्धतीने केले आहे कशा पद्धतीने वार्डए रचना आहे त्यासोबतच सरकारच्या लोककल्याणकारी योजना कशा पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचलेला आहे त्याचा आढावा या बैठकीत घेत असताना कोणाला कोणती जबाबदारी द्यायची कशा पद्धतीने प्रचार यंत्रणा राबवायची या बाबत आढावा घेण्यात आला आहे. भिवंडी पूर्व विधानसभा मतदार संघात भाजपा दावा करीत असल्या बाबत विचारले असता,महायुती मध्ये कोणती जागा कोणता पक्ष लढवेल हे महायुती मधील वरिष्ठ पदाधिकारी ठरवतील.विधानसभा जागावाटप झाल्यानंतर ज्या पक्षाची जागा असेल त्यासाठी सर्व महायुती चे पदाधिकारी काम करतील असा विश्र्वास खासदार श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला असून,भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदार संघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोट्यावधी रुपयांचा विकासनिधी दिल्याने या ठिकाणी पोषक वातावरण आहे काम सुरू आहेत न झालेली काम येत्या काळात आम्ही करू असे आश्र्वासन श्रीकांत शिंदे यांनी दिले.

## न्यायालयीन कामकाजात ढवळाढवळ करू नका, मृत आरोपीच्या कुटुंबीयांच्या वकिलांना उच्च न्यायालयाची ताकीद

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील प्रमुख आरोपी अक्षय शिंदे याच्या कथित पोलीस चकमकीची न्यादंडाधिकाऱ्यांमार्फत चौकशी सुरू असून या न्यायालयीन चौकशीशी संबंधित कागदपत्रांच्या मागणीसाठी वारंवार अर्ज करू नका. हे न्यायालयीन कामकाजात ढवळाढवळ करण्यासारखे आहे, अशा शब्दात उच्च न्यायालयाने शुक्रवारी शिंदे याच्या कुटुंबीयांच्या वकिलांना बजावले.

न्यायालयीन चौकशीवर उच्च न्यायालयही लक्ष ठेऊन आहे, असे असतानाही याचिकाकर्ते एका माहिती अधिकार कार्यकर्तासारखे वारंवार अर्ज करून न्यायालयीन कामकाजात ढवळाढवळ करत आहेत. त्यांच्या अशा वर्तनामुळे कामकाजात अडथळा निर्माण होऊन परिणामी खटल्यालाही विनाकारण विलंब होईल, असे खडेबोल न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने शिंदे कुटुंबीयांचे वकील अमित कटारनवरे यांना सुनावले.

तत्पूर्वी, प्रत्येक कोठडीतील मृत्यूची न्यायदंडाधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली जाते. या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे शाखेतर्फे केला जात असला तरीही सर्व संबंधित कागदपत्रे चौकशीसाठी न्यायदंडाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आल्याची माहिती महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी मागील सुनावणीच्या वेळी न्यायालयाला दिली होती. त्यानुसार, चौकशी करणाऱ्या न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर सादर केलेली कागदपत्रे आणि चौकशी संबंधित न्यायालयाचे निरीक्षण देण्याची विनंती शिंदे याच्या कुटुंबीयांच्या वतीने कटारनवरे यांनी न्यायालयात अर्जाद्वारे केली होती. परंतु, न्यायालयीन चौकशी प्रक्रिया अद्यापही सुरू असून ती गोपनीय आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर न्यायदंडाधिकारी त्यांचा अहवाल न्यायालयात सादर करणार आहेत. त्याआधी याचिकाकर्त्यांना संबंधित कागदपत्रे देता येणार नाहीत, असे स्पष्ट करून सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी याचिकाकर्त्यांच्या अर्जाला विरोध केला.

दरम्यान, मुख्य आरोपींना वाचवण्यासाठी पोलिसांनी अक्षय शिंदे याला बनावट चकमकीद्वारे ठार केल्याचा आरोप करून या चकमकीची विशेष तपास पथकाद्वारे (एसआयटी) चौकशी करण्याच्या मागणीसाठी शिंदे याच्या वडिलांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या चकम कीची चौकशी जलदगतीने पूर्ण करून त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश न्यायालयाने महानगरदंडाधिकाऱ्यांना दिले आहेत.

## सत्तेत असताना पवारांकडून मराठा आरक्षण का नाही? - उदयनराजे

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** चार वेळा मुख्यमंत्री, केंद्रात मंत्री, अनेक वर्षे सत्तेत प्रमुखपदी असताना शरद पवारांनी मराठा समाजाला आरक्षण का दिले नाही. उलट त्यांनी १९९४ मध्ये काढलेल्या अधिसूचनेने मराठा समाजाला आरक्षणाचे दरवाजे बंद करून ठेवले असल्याचा आरोप खासदार उदयनराजे भोसले यांनी साताऱ्यात पत्रकारांशी बोलताना केला.

सध्या सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनावर उदयनराजे बोलत होते. ते म्हणाले, की गेल्या पंचाहत्तर वर्षात पवार हे किमान ६५ वर्षे सत्तेच्या केंद्रस्थानी आहेत. मग एवढा प्रदीर्घ काळ सत्ता उपभोगत असताना या समाजाचे दुःख पवारांना समजले नाही का ? या कालावधीत त्यांनी समाजाला आरक्षण देणे शक्य असताना ते का दिले नाही. उलट १९९४ मध्ये काढलेल्या अधिसूचनेने मराठा समाजाला आरक्षणाचे दरवाजे बंद करून ठेवले. आज या विषयावर सर्वत्र गोंधळ सुरू



असताना पवारांना हे प्रश्न कुणीही विचारत नाही. स्वत:ला 'जाणता राजा' म्हणवून घेणाऱ्या पवारांनी या प्रश्नांची उत्तरे समाजाला दिली पाहिजेत. त्यांनी मुद्दामहून केलेल्या दुर्लक्षामुळे समाज आज या स्थितीला आला आहे. यास सर्वस्वी पवार जबाबदार असल्याचा आरोप उदयनराजे यांनी केला. पवार सध्या अनेक ठिकाणी प्रचारासाठी जात आहेत. या वेळी त्यांनी वरील प्रश्नांची उत्तरे द्यावीत, असेही उदयनराजे म्हणाले.

दरम्यान, मनोज जरांगे यांच्या नव्या मागण्यांबाबत मतभेद व्यक्त करत उदयनराजे म्हणाले, की तुम्ही प्रश्न सोडवण्यासाठी आंदोलन करत आहात की तयार करण्यासाठी. सम ाजाला काहीतरी मिळावे यासाठी आंदोलन असते. आंदोलनाच्या निमित्ताने सगळ्या समाजाचा राजकीयदृष्टचा वापर सुरू आहे. निवडणुका येतील जातील परंतु या चुकांचे परिणाम भविष्यात संबंधितांना भोगावे लागतील. गंमत अशी, की एवढे वर्षे पवार सत्तेत असताना ही अशी आंदोलने होत नव्हती. ते विरोधी पक्षात गेले, की लगेच ही अशी आंदोलने कशी सुरू होतात. हा सारा प्रकार समाजदेखील पाहात आहे. जनतेला हे कळत नाही असे समजू नका. याचे भान प्रत्येकाने ठेवणे गरजेचे असल्याचा टोला उदयनराजे यांनी लगावला.

महायुतीच्या माध्यमातून राज्यात अनेक विकासाची कामे मार्गी लागली आहेत. नव्या योजना कार्यान्वित झाल्या आहेत. यामुळे राज्यात महायुतीच्या सर्वाधिक जागा निवडून येऊन महायुतीचे सरकार येईल. महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी आपण राज्यभर फिरणार असल्याचे उदयनराजे यांनी या वेळी जाहीर केले.

माझे बंधू शिवेंद्रसिंहराजे भोसले हे राज्यात सर्वाधिक मतांनी निवडून येतील. त्यांच्यासाठी गावोगावी जाऊन प्रचार करणार आहे. आम्ही दोघांनी केलेल्या कामांच्या जीवावर मतदार त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देतील, असेही उदयनराजे म्हणाले.

## महाराष्ट्रातील निसर्ग पर्यटन स्थळांना मुबलक निधी

**अमरावती/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याअगोदर राज्य शासनाने राज्यातील ३२ निसर्ग पर्यटन स्थळांना ७२४५ कोटींचा भरघोष निधी दिला आहे. यामध्ये ताडोबासह विदर्भातील नऊ वनपर्यटन स्थळांचा समावेश आहे. वनविभागाच्या क्षेत्रामध्ये पर्यटनाला चालना मिळावी, तसेच वनक्षेत्रातील पुरातन स्थळांचा पर्यटन म्हणून उपयोग करण्यासाठी अलीकडे वन विभागात निसर्गपर्यटन अर्थात जंगल सफारी, ऐतिहासिक गडकिल्ले, उद्यान अभयारण्य, व्याघ्र प्रकल्प, ईको पार्क ही संकल्पना तयार करण्यात आली आहे. याकरिता राज्य शासन २४०६-२२९५ मध्ये लेखाशीर्षातून दरवर्षी निधी उपलब्ध करून देत असते. मात्र, गेल्या दोन वर्षापासून निसर्ग पर्यटन स्थळांकरिता शासनाने निधी उपलब्ध करून दिलेला नव्हता, हे विशेष. मात्र, निवडणुकीच्या तोंडावर निसर्ग पर्यटन विकास स्थळांना शासन पावल्याचे दिसून येते. राज्य सरकारने चंद्रपूर जिल्ह्यातील निसर्ग पर्यटन स्थळाकरिता भरपूर निधी दिला आणलेला असताना विदर्भातील सर्वात मोठ्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला निधी मिळालेला नाही. याशिवाय बोर, पेंच आणि नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला निधी देण्यात आलेला नाही. राजकीय अनास्था व प्रशासकीय धोरण यासाठी कमी पडल्याचे स्पष्ट होते. यवतमाळ जिल्हातील टिपेश्वरला मात्र २०४.६० कोटी एवढा निधी मिळाला आहे.

## सर्फराज खाननं 'कीवी' गोलंदाजांना पाजलं पाणी; 'अशी' कामगिरी करणारा भारताचा २२वा खेळाडू

बेंगळुरु : आपत्तीत संधी शोधणं कशाला म्हणतात तर हे सर्फराज खानकडून शिकावं. न्यूझीलंडविरुद्ध बेंगळुरु इथं सुरु असेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय क्रिकेट संघावर डावाच्या पराभवाची भीती असताना सर्फराज खाननं कारकिर्दीतील सर्वात मोठी खेळी खेळून सर्वांची मनं जिंकली. एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या पहिल्या कसोटीच्या चौथ्या दिवशी सर्फराज खाननं आपलं पहिलं आंतरराष्ट्रीय शतक झळकावलं. तिसऱ्या दिवशीच्या ७० धावांच्या पुढं खेळताना सर्फराजनं चौकारासह शतक पूर्ण केलं. विशेष म्हणजे याच साम न्याच्या पहिल्या डावात सर्फराज खान शून्यावर आउट झाला होता, आणि आता भारताच्या दुसऱ्या डावात त्यानं शतक ठोकलं, पहिल्या डावात शून्य आणि दुसऱ्या डावात शतक करणारा सर्फराड खान भारताचा २२वा खेळाडू ठरलाय.

यावर्षी झालं कसोटी पदार्पण : देशांतर्गत क्रिकेटमध्ये भरपूर धावा केल्यानंतर सर्फराज बराच वेळ संधी येण्याची वाट पाहत राहिला. पण त्याला भारतीय संघात स्थान मिळू शकलं नाही. यामुळं नाउमेद होण्याऐवजी तो स्वत:वर काम करत राहिला.

## '...अन् मग मी अखेरचा श्वास घेईन' ; शाहरुख खाननं का केली सेटवर मरण्याची गोष्ट?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान हा लोकप्रिय कलाकारांपैकी एक आहे. शाहरुख खानचे चाहते फक्त भारतात नाही तर परदेशातही आहेत. शाहरुखला या यशाच्या शिखरावर पोहचण्यासाठी खूप मेहनत करावी लागली आहे. त्यानं एका मुलाखतीत सांगितलं की शेवटच्या श्वासापर्यंत काम करत राहणार आणि त्याची इच्छा आहे की त्यानं त्याचा शेवटचा श्वास हा चित्रपटाच्या सेटवरच घ्यायला हवा. शाहरुखनं हे मान्य केलं की अभिनयाच्या माध्यमातून तो त्याचं आयुष्य खूप एन्जॉय करतो आणि त्याला लोकांचं मनोरंजन करायला खूप आवडतं.

शाहरुख खाननं ही मुलाखत लोकार्नो फिल्म फेस्टिवलच्या यूट्यूब चॅननला ही मुलाखत दिली होती. या मुलाखतीत त्यानं त्याचे विचार आणि भविष्यातील प्लॅनिंगविषयी देखील सांगितलं आहे. याच फिल्म फेस्टिवलमध्ये शाहरुखला लाइफटाइम अचीवमेंट पुरस्कार देत सन्मानित करण्यात आलं. मुलाखतीत त्याला विचारण्यात आलं की 'त्याला कायम अभिनया करायचा आहे का?' शाहरुख खान म्हणाला, 'मला कायम अभिनय करायचा आहे का? तर हो, जोपर्यंत मी शेवटचा श्वास घेत नाही तोपर्यंत मला अभिनय करायचा आहे, माझ्या आयुष्यात एकच स्वप्न आहे की कोणी ॲक्शन म्हणेल आणि मग मी अखेरचा श्वास घेईन. ते कट म्हणतील आणि त्यानंतरही मी उठत नाही. आता हे संपल, प्लीज. मी म्हणतो, नाही. जोपर्यंत ते सगळे बोलत नाही की सीन अगदी योग्य झाला आहे. हो मला कायम अभिनय करायचा आहे.'

शाहरुख खाननं सांगितलं की 'जसं लोकं समजतात, तसा तो गंभीर अभिनेता नाही. त्यानं सांगितलं की जर मी दोन मिनिटांसाठी मनोरंजन करू शकतो, तर हे प्रेम आहे. जर मी कोणाला ५० वर्ष प्रेम करु शकतो तर हे मनोरंजन आहे. जर मी कोणाचं ३० सेकंदासाठी मनोरंजन करु शकतो तर ही क्रिएटिव्हिटी आहे. त्यामुळे मी एकाच गोष्टीसाठी वेगवेगळी नाव शोधत असतो आणि मला हा आनंद शेअर करण्यास खूप मज्जा येते. ज्यामुळे लोकानं एक तास किंवा त्यापैकी जास्त वेळ त्या गोष्टीची आठवण राहते आणि ते त्याचा आनंद घेतात.'

# माढा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीला झटका

## काँग्रेसच्या इच्छुक उमेदवारांने मराठा समाजाकडे मागितली उमेदवारी

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** महाविकास आघाडीकडून इच्छुक असणाऱ्या मीनल साठे यांनी माढा विधानसभा मतदारसंघासाठी सकल मराठा समाजाकडून उमेदवारी. त्यामुळे राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली असून हा महाविकास आघाडीला झटका असल्याच्या प्रतिक्रिया उमटत उमटत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील ११ विधानसभेसाठी शनिवार दि.१९ ऑक्टोबर रोजी मनोज जरांगे पाटील यांच्या सुचनेनुसार इच्छुकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. माढा विधानसभा मतदार संघात मीन साठे हे महाविकास आघाडीकडून इच्छुक असताना आज मनोज जरांगे पाटील यांच्या सुचनेनुसार आयोजित करण्यात आलेल्या इच्छुकांच्या मेळाव्यात मीनल साठे यांनी माढा विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी मागीतली. त्यामुळे मतदारसंघात एकच खळबळ उडाली असून हा महाविकास







आघाडीला झटका असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. मीनल साठे हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार धनाजी साठे यांच्या सून तर माढ्याच्या माजी नगराध्यक्षा आहेत. मीन साठे यांनी उमेदवारी मागितल्याने महाविकास आघाडीत माढा विधानसभेवरून राष्ट्रवादी शरद पवार पक्ष आणि काँग्रेस यांच्यामध्ये गोंधळ उडाला आहे. तर मीनल साठे यांनी उमेदवारीसाठी शरद पवार यांची काही दिवसापूर्वीच भेट घेतली होती. माढा विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेसला देण्यात यावा, यासाठी काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडे मागणी केली होती.आता मात्र सकल मराठा समाजाकडे मीनल साठे यांनी उमेदवारी मागितल्यामुळे महाविकास आघाडीला हा मोठा झटका असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

विविध वृत्त...

## राज ठाकरेंचा भोंगा उतरवण्याचं काम वंचितचे कार्यकर्ते करतील, भर सभेत सुजात आंबेडकरांची सडकून टीका!



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीमुळे संपूर्ण महाराष्ट्राचे वातावरण सध्या राजकारणमय झाले आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात सध्या जागावाटपावर चर्चा चालू आहे. एकीकडे या दोन्ही आघाड्यांनी निवडणुकीसाठी कंबर कसलेली असताना दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीनेदेखील दंड थोपटले आहेत. वंचितने काही जागांवर आपले उमेदवार जाहीर केले असून नेते जोमाने प्रचार करत आहेत. दरम्यान अशाच एका प्रचारसभेत बोलताना सुजात आंबेडकर यांनी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली आहे. आम्ही राज ठाकरे यांचे भोंगे उतरवू असे सुजात आंबेडकर म्हणाले आहेत.

सुजात आंबेडकर नेमकं काय म्हणाले?

सुजात आंबेडकर वाशिममध्ये आयोजित केलेल्या एका प्रचारसभेत बोलत होते. यावेळी बोलताना ''मोठ्या स्पीकरवर, भोंग्यांवर हनुमान चालिसा लावले तर त्याला विरोध करण्याचं काम तसेच राज ठाकरे यांचा भोंगा उतरवण्याचं काम वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते करतील. जोपर्यंत पाच ते सहा मुस्लीम उमेदवार निवडून येणार नाहीत, तोपर्यंत मुस्लीम समाजाचं भलं कोणीही करू शकत नाही,'' असं सुजात आंबेडकर म्हणाले.

१५ टक्के भागिदारी देईल, त्यालाच...

तसेच, ''काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेनेचे प्रस्थापित नेते आपला विकास करू शकत नाही. महाराष्ट्रात मुस्लिमांची संख्या १५ टक्के आहे. जो पक्ष आम्हाला १५ टक्के भागिदारी देईल, १५ टक्के उमेदवारी देईल, त्यालाच मुस्लीम समाज मतदान करेल,'' असेही सुजात आंबेडकर म्हणाले.

विधानसभा निवडणुकीत नेमकं काय होणार?

दरम्यान, यावेळच्या विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने एकला चलो रे ची भूमिका घेतली आहे. वंचितने आपल्या उमेदवारांच्या आतापर्यंत तीन याद्या जाहीर केल्या आहेत. वंचितची तिसरी यादी १६ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली. लवकरच आणखी जाही जागांवर हा पक्ष आपले उमेदवार देणार आहे. लोकसभा निवडणुकीत वंचित आणि महाविकास आघाडी यांच्यात युतीचे अनेक प्रयत्न झाले. मात्र शेवटी लोकसभा निवडणुकीतही महाविकास आघाडीने स्वतंत्रपणे निवडणूक लढवली होती. यावेळीही वंचित स्वतंत्रपणे निवडणूक लढवत आहे. त्यामुळे या निवडणुकीत नेमकं काय होणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## 'मी कोणावरही व्यक्तिगत टीका केलेली नाही', नाना पटोलेंच्या नाराजीनंतर संजय राऊतांचं स्पष्टीकरण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज्यातील काँग्रेसचं नेतृत्व हे जागावाटपाच्या चर्चेसाठी सक्षम नसल्याचे म्हटले होते. यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही थेट पत्रकार परिषदेतूनच पलटवार केला. संजय राऊत हे त्यांच्या पक्षश्रेष्ठींचं म्हणजेच उद्धव ठाकरेंचं ऐकत नसतील तर हा त्यांचा प्रश्न आहे, असे म्हणत नाना पटोले यांनी संजय राऊतांबद्दलची नाराजी उघड केली. त्यामुळे नाना पटोले आणि संजय राऊत यांच्यातील वाद आता चव्हाट्यावर आल्याचं पाहायला मिळले. आता संजय राऊत यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

संजय राऊत म्हणाले की, चर्चा पूर्णपणे थांबली असे म्हणता येणार नाही. काल दिवसभर आम्ही शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत चर्चा केली. राष्ट्रवादी काँग्रेस आणि आमच्यातील बरेचशे पेज सुटत चालले आहे. एकत्र बसून गुंता सोडवण्याची मानसिकता आमच्या दोघांमध्ये आहे. आम्ही अनेक जागांवरचा तिढा सोडवलेला आहे. महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नईतला मुंबईला येतील ते मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करतील आणि मग पुढे काय मार्ग निघेल ते बघू, असे त्यांनी म्हटले.

राष्ट्रीय पक्षांनी प्रादेशिक पक्षांना स्थान दिले पाहिजे

नाना पटोले जागा वाटपात अडवणुकीची भूमिका घेत आहेत का? असे विचारले असता संजय राऊत म्हणाले की, मी असे म्हटलेले नाही. तुम्ही माझ्या तोंडी घालू नका. मी व्यक्तिगतरित्या कोणावरही मतप्रदर्शन केलेले नाही. तेवढी सभ्यता, सुसंस्कृतपणा आमच्यात आहे. प्रत्येक आघाडीत जागा वाटपाचा कुठेतरी अडथळा निर्माण होतो. भाजप – शिवसेना एकत्र होती तेव्हा देखील असे अडथळे होते. काँग्रेस हा एक खूप मोठा पक्ष आहे. आम्ही प्रादेशिक पक्ष आहोत. राष्ट्रीय पक्षांनी प्रादेशिक पक्षांना त्या त्या राज्यात स्थान दिले पाहिजे, ही आमची भूमिका आहे. प्रादेशिक पक्षांच्या जोरावरच सध्या राष्ट्रीय राजकारण सुरू आहे. प्रादेशिक पक्ष नसते तर मोदी आज पंतप्रधान होऊ शकले नसते, असे त्यांनी म्हटले.

मी व्यक्तिगत कोणावरही टीका केलेली नाही

आता आपल्या पक्षासोबत हायकमांड चर्चा करणार का? असे विचारले असता संजय राऊत म्हणाले की, मी यावर आता कुठलेही भाष्य करणार नाही. मी व्यक्तिगत कोणावरही टीका केलेली नाही. माझी भूमिका ही पक्षाची असते. उद्धव ठाकरे यांच्या परवानगीशिवाय मी कधीही काहीही बोलत नाही, असेही त्यांनी म्हटले आहे. तर नाना पटोले बैठकीत असतील तर चर्चा होणार नाही अशी भूमिका समोर आली होती याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, अशा भूमिका आमच्या पक्षाकडून कधी मांडल्याचे मला आठवत नाही. अशा भूमिका कोणी घेत नाही, असे त्यांनी यावेळी सांगितले.

# सिंदखेडराजामध्ये काका-पुतणी लढत होणार..?

## काका राजेंद्र शिंगणे विरुद्ध पुतणी गायत्री शिंगणे आमने सामने

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघातील विद्यमान आ. डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी काही काळापूर्वी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. मात्र अचानक दि.१९ ऑक्टोबर रोजी डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने राजकीय खळबळ उडाली आहे. तर शरद पवार राष्ट्रवादीच्या व डॉ. राजेंद्र शिंगणे यांची पुतणी गायत्री शिंगणे यांना मात्र डॉ. शिंगणे यांच्या पक्ष प्रवेशाने राजकीय अडथळा निर्माण झाला आहे. आता शरद पवार राष्ट्रवादीकडून डॉ. राजेंद्र शिंगणे यांना उमेदवारी दिल्यास त्यांची पुतणी गायत्री शिंगणे सुद्धा विधानसभा निवडणूक लढविण्यावर ठाम असल्याने सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघात काका विरुद्ध पुतणी असा सामना रंगण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आ. डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी दि.१९ ऑक्टोबर रोजी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, आ.जयंत पाटील यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते- पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्यासह पक्षाच्या संसदीय मंडळाचे सदस्य हे देखील उपस्थित होते.ऐन विधानसभा निवडणुकीत डॉ.शिंगणे यांनी तुतारी फुंकल्याने अजित पवारांना मोठा धक्का बसला आहे. तर डॉ. शिंगणे यांच्या पक्षप्रवेशामुळे सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरण बदलून गेले आहे. शिंगणे यांच्या पक्षप्रवेशामुळे त्यांची पुतणी गायत्री शिंगणे काय भूमिका घेणार, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### मी अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार



बुलढाण्यातील सिंदखेडराजा मतदारसंघाचे आ.डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी नुकताच अजित पवार गटातून शरद पवार गटात प्रवेश केला. तर मी सुद्धा शरद पवार यांच्याकडे सिंदखेडराजा मतदार संघासाठी उमेदवारी मागितिली आहे. जर डॉ. शिंगणे यांना उमेदवारी शरद पवार यांनी दिली तर मी अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार आहे. त्यावर मी ठाम आहे, अशी प्रतिक्रिया डॉ. शिंगणे यांच्या पुतणी गायत्री शिंगणे यांनी दिली आहे.



### तब्बल पाच वेळा आमदार

सिंदखेडा राजा विधानसभा मतदार संघात डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी तब्बल पाच वेळा आमदार म्हणून विजय मिळविला आहे. तर आमदारकीच्या काळात त्यांनी कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री म्हणूनही राज्य सरकारमध्ये यशस्वी काम केले आहे. तर गत वर्षात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीनंतर डॉ. शिंगणे हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत गेले होते. तर आज पुन्हा शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत परत जात तुतारी हाती घेतली आहे.मात्र डॉ. शिंगणे यांच्याविरोधात त्यांच्या पुतणीनेच रणशिंग फुकले आहे. त्यामुळे मात्र राजकीय वातावरण गरम झाले आहे.

## बीडमध्ये विधानसभेचं रणकंदन; महाविकास आघाडी आणि महायुतीचा फॉर्म्युला ठरला, कोणत्या मतदारसंघात कुणाला तिकीट?

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : राज्यातील विधानसभा निवडणुकांचं बिगुल वाजलं असून राज्यात निवडणुकीचा रणसंग्राम पाहायला मिळत आहे. निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. अशातच यंदा राज्यात मुख्य लढत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी दिसून येणार आहे. याच पार्श्वभूमीवर दोन्ही आघाड्यांच्या वतीनं आपापल्या परीनं मोर्चेबांधणी सुरू आहे. अशातच आता महाविकास आघाडीकडून बीड जिल्ह्याचा फॉर्म्युला समोर आला आहे.

बीड जिल्ह्यातील सहा जागांपैकी पाच जागांवर महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. तर एका म्हणजे, गेवराई विधानसभा मतदारसंघावर शिवसेना ठाकरे गटानं दावा केला आहे. महाविकास आघाडीकडून परळी विधानसभा मतदारसंघ, केज विधानसभा मतदारसंघ, माजलगाव विधानसभा मतदारसंघ, बीड विधानसभा मतदारसंघ आणि आष्टी विधानसभा मतदारसंघ या ठिकाणी शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असणार आहेत.

बीडमधील महा विकास आघाडीचे उमेदवार कोण?

बीड विधानसभा मतदारसंघ : संदीप क्षीरसागर

केज विधानसभा मतदारसंघ : अंजली घाडगे

परळी विधानसभा मतदारसंघ : राजेभाऊ फड

आष्टी विधानसभा मतदारसंघ : मेहबूब शेख

माजलगाव विधानसभा मतदारसंघ : रमेश आडसकर

बीड जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार

बीड जिल्ह्यात महायुतीकडून दोन जागेवर भारतीय जनता पार्टीचे उमेदवार असतील आणि चार जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार असतील. बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघ आणि केज विधानसभा मतदारसंघ मधून भाजपचे उमेदवार महायुतीकडून निवडणूक लढवतील. तर, अजित पवार गटाकडून बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे चार उमेदवार असतील माजलगाव विधानसभा मतदारसंघ गेवराई विधानसभा मतदारसंघ परळी विधानसभा मतदारसंघ आणि बीड विधानसभा मतदारसंघ या ठिकाणी अजित पवार गटाचे उमेदवार पाहायला मिळतील.

बीड जिल्ह्यातील महायुतीचे संभाव्य उमेदवार

परळी विधानसभा मतदारसंघ : राष्ट्रवादी काँग्रेस : धनंजय मुंडे

माजलगाव विधानसभा मतदारसंघ : राष्ट्रवादी काँग्रेस : प्रकाश सोळंके

बीड विधानसभा मतदारसंघ : राष्ट्रवादी काँग्रेस : योगेश शिरसागर

गेवराई विधानसभा मतदारसंघ : राष्ट्रवादी काँग्रेस : विजयसिंह पंडित

## परळी मतदारसंघांमध्ये मोठी दहशत, अनेक लोक जेलमध्ये गेले, धनंजय मुंडे मंत्री म्हणून फेल झाले; शरद पवार गटाचा हल्लाबोल

**परळी/प्रतिनिधी** : धनंजय मुंडे यांनी २०१९ च्या वचननाम्यातील शब्द पाच वर्षात पाळले नाहीत, मंत्रीपदाचा फायदा फक्त वैयक्तिक झाला. धनंजय मुंडे मंत्री म्हणून फेल झाले असा घणाघाती आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते सुनील गुट्टे यांनी केला. शेतकरी संवाद यात्रेच्या समारोप प्रसंगी पत्रकार परिषदेत ते बोलत होते.शरद पवार गटाचे नेते सुनील गुट्टे म्हणाले की, धनंजय मुंडेंचा वचन नामा फेल झाला. परळी मतदारसंघात शेतकरी बेरोजगार विद्यार्थी सर्वांचे प्रश्न तसेच आहेत. शंभर टक्के लोकांचा विकास झालेला नाही. मूलभूत प्रश्न तसेच आहेत. मतदारसंघात मोठी दादागिरी आहे.

## महादजी पाटील माध्यमिक विद्यालयात मतदार जनजागृती

### मुख्याद्यापक कुटे यांनी केले मार्गदर्शन : मतदानाची टक्केवारी वाढविण्यावर भर

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव** : बेलगाव येथे महादजी दर्याची पाटील माध्यमिक विद्यालयात शासकीय परिपत्रकानुसार दि.१६ ऑक्टोबर रोजी मतदार जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक कुटे हे होते. तर, प्रमुख अतिथी म्हणून प्रतिष्ठीत नागरिक धीरज बाजड, परशराम कंकाळ यांची उपस्थिती होती. यावेळी मुख्याध्यापक दीपक कुटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आचारसंहितेचे नियम, मतदानाचे मूल्य तसेच नागरिकांमध्ये मतदानाविषयी असलेली उदासीनता,त्यामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन करून लोकशाहीमध्ये मतदानाचे महत्व विद्यार्थ्यांना अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेमध्ये सांगितले. तसेच गावातील प्रत्येक नागरिकांनी मतदान करावे, निवडणूक दृष्टीने घ्यावयाच्या खबरदारी यावर मार्गदर्शन करून मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून टक्केवारी वाढवावी, असे आवाहन केले. कलाशिक्षक सचिन रहाटे यांनी आकर्षक बॅनर बनवून मतदान जनजागृती केली.अनिल जायभाये यांनी कार्यक्रमाचे संचालन करून आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक कावरखे, वानखेडे, गीते, मेटांगळे,रहाटे, गायकवाड,बागुल,साखरे, शिक्षकेतर कर्मचारी विजय दाभाडे गजानन देशमुख यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थनींनी परिश्रम घेतले.



## विजांच्या गडगडाटांसह अमरावतीत मुसळधार पाऊस; सोयाबीन पिकाला जोरदार फटका

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : अमरावती शहर आणि जिल्ह्यातील विविध भागात शनिवारी पहाटे साडेचार वाजल्यापासून विजांच्या गडगडाटांसह जोरदार पाऊस बरसला. या पावसामुळे ऐन दिवाळीसमोर शेतकऱ्यांची चिंता वाढवली. मुसळधार पावसानं पिकांचं खूप मोठं नुकसान झालं आहे. शेतात पडून असलेल्या सोयाबीन पिकाला या मुसळधार पावसाचा जोरदार फटका बसला आहे. तर सध्या फुलोऱ्यावर असलेल्या तुरीच्या पिकालाही फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

अमरावती परिसरात मुसळधार पाऊस : विदर्भात तुरळक ठिकाणी १८ ते १९ ऑक्टोबर दरम्यान विजांच्या गडगडाटांसह हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली होती. शनिवारी पहाटेपासून मात्र मुसळधार पावसाला सुरुवात झाली. आकाशात प्रचंड काळे ढग दाटून आले असून आज दिवसभर कधी मुसळधार तर कधी रिमझिम पावसाची शक्यता श्री शिवाजी कृषी महाविद्यालयातील हवामान शास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक अनिल बंड यांनी वर्तवली. मुसळधार कोसळणाऱ्या पावसामुळे मात्र शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

मुसळधार पावसानं शेतकऱ्यांचं नुकसान : ऐन दिवाळी समोर असताना अमरावतीसह पश्चिम विदर्भातील अकोला आणि बुलडाणा जिल्ह्यात बरसणाऱ्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. सध्या शेतात असणारं सोयाबीन पीक काही जणांनी घरी आणलं असलं तरी मोठ्या प्रमाणात सोयाबीन शेतातच पडून आहे. या मुसळधार पावसामुळे शेतात पडून असणारं सोयाबीन खराब होण्याची भीती शेतकऱ्यांना सतावतेय. अनेकांच्या शेतात तुरीला फुलोरा आला असून दिवाळीनंतर येणाऱ्या तुरीवर देखील या पावसामुळे संकट कोसळलं. या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात तुरीला फटका बसण्याची शक्यता आहे. मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## परतीच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, नुकसानग्रस्तांना भरपाई द्यावी

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : राज्याच्या विविध भागात मागील काही दिवसांमध्ये परतीच्या पावसापरतीच्या पावसामुळे झालेल्या शेतीच्या तसेच इतर नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, त्याचबरोबर नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.मुळे झालेल्या शेतीच्या तसेच इतर नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, त्याचबरोबर नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

राज्यातील विविध भागांमध्ये अमरावती, पुणे, नाशिक, कोल्हापूर, मराठवाडा आदी विविध भागातील विविध जिल्हे किंवा तालुक्यांमध्ये मागील काही दिवसात मुसळधार पाऊस झाला. काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला.

यामुळे अनेक ठिकाणी शेतपिकांचे नुकसान झाले आहे. बऱ्याच ठिकाणी शेतात काढून ठेवलेल्या विविध प्रकारच्या पिकांचे नुकसान झाले आहे. काढलेली पिके भिजली आहेत.

विशेषतः भात, सोयाबीन, तूर, कपाशी, ऊस आदी विविध प्रकारच्या पिकांसह फळबागांचेही नुकसान झाले आहे.

या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत. नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

पंचनामे आणि नुकसान भरपाईसाठी नुकसानग्रस्त गावांमध्ये त्वरित यंत्रणा कार्यरत करण्यात यावी. संबंधित अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात, असे निदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

जिल्हास्तरावरील आपत्ती व्यवस्थापन कक्ष, तालुकास्तरीय यंत्रणा, इतर सर्व संबंधित विभाग यांनी यासाठी समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

